**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 11 | July 2015**

**ISSN:- 2393-8900**

**Research Article**

# *उदगीर तालुक्यातील आर्य समाजाचे हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील योगदान*

***भांजे विजयकुमार प्रल्हादराव***

इतिहास विभाग प्रमुख , कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे महाविद्यालय,
वाशी. ता. वाशी, जि. उस्मानाबाद

*सारांश –*

आजच्या युगात इतिहास या शब्दाभोवती फार मोठे वलय निर्माण झाले आहे. इतिहासात आज अनेक शाखांचा उदाः राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक इत्यादीचा समावेश होतो. म्हणजेच इतिहासाचे स्वरूप आणि व्याप्ती मोठ्या प्रमाणात विस्तारलेली आहे. त्यामुळे इतिहासात अनेक लेखनप्रवाह निर्माण झाले आहेत. पूर्वी राष्ट्रीय आणि जागतिक इतिहास लेखनालाच महत्त्व होते. परंतु राष्ट्रीय इतिहास हा प्रादेशिक इतिहासातून व प्रादेशिक इतिहास स्थानिक इतिहासातून अभिव्यक्त होत असल्यामुळे आज इतिहासलेखनात स्थानिक इतिहासाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. इतिहास ही मानवी जीवनाची सर्वांगीण कहाणी आहे. प्रा. डॉ. रोमिला थापर यांनी 1976 साली पंजाब इतिहास परिषदेतील व्याख्यानात प्रदेशिक इतिहासाची व्याप्ती आणि महत्व यांची विस्तृतपणे चर्चा केली होती. भव्य एकत्वाशी जोडलेल्या विभागाचा, अति विशिष्टत्वाचा वेध प्रादेशिक इतिहास घेतो. इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोहोंचा वेध घेत असतो. त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. जागतिक इतिहासाला Macro Study तर प्रादेशिक इतिहासाला Micro Study असे म्हणतात.

## *प्रस्तावना :*

आजच्या युगात इतिहास या शब्दाभोवती फार मोठे वलय निर्माण झाले आहे. इतिहासात आज अनेक शाखांचा उदाः राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक इत्यादीचा समावेश होतो. म्हणजेच इतिहासाचे स्वरूप आणि व्याप्ती मोठ्या प्रमाणात विस्तारलेली आहे. त्यामुळे इतिहासात अनेक लेखनप्रवाह निर्माण झाले आहेत. पूर्वी राष्ट्रीय आणि जागतिक इतिहास लेखनालाच महत्त्व होते. परंतु राष्ट्रीय इतिहास हा प्रादेशिक इतिहासातून व प्रादेशिक इतिहास स्थानिक इतिहासातून अभिव्यक्त होत असल्यामुळे आज इतिहासलेखनात स्थानिक इतिहासाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. इतिहास ही मानवी जीवनाची सर्वांगीण कहाणी आहे. प्रा. डॉ. रोमिला थापर यांनी 1976 साली पंजाब इतिहास परिषदेतील व्याख्यानात प्रदेशिक इतिहासाची व्याप्ती आणि महत्व यांची विस्तृतपणे चर्चा केली होती. भव्य एकत्वाशी जोडलेल्या विभागाचा, अति विशिष्टत्वाचा वेध प्रादेशिक इतिहास घेतो. इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोहोंचा वेध घेत असतो. त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. जागतिक इतिहासाला डंबतव ैजनकल तर प्रादेशिक इतिहासाला Micro Study असे म्हणतात.

प्रामुख्याने स्थानिक इतिहास फार कमी प्रमाणात लिखित स्वरूपात असतो तो विखुरलेल्या स्वरूपात किंवा जनस्मृतीमध्ये दडलेला असतो. म्हणून इतिहास संशोधकांनी व लेखकांनी त्याला संकलित करून लिखित व इतर पुरावे जुळवून कमबध्द पध्दतीने मांडावयाचा असतो. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास मागील काही वर्षापासून विविध ग्रंथातून स्पष्ट करण्याचे प्रयत्न होत आहेत. मात्र त्यात स्थानिक किंवा क्षेत्रीय संदर्भ काही ठिकाणचेच आलेले आहेत व इतर क्षेत्रे ओलिस पडलेली आहेत. अनेक व्यक्तिचा हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात सिहांचा वाटा असूनही व त्यातील हुतात्मे, स्वातंत्र्य

सैनिकांचा इतिहास तसेच हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील उदगीर तालुक्यातील आर्य समाजाचे कार्य काही प्रमाणात दुर्लक्षित राहिलेले आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात हा विषय घेवून तो विस्तृतपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### *संशोधनाची उदिष्ट्ये :*

1.हैद्राबाद मुक्तिसंग्रामात उदगीर तालुक्यातील आर्य समाजाने निजामच्या अन्यायकारी धोरणाविरूध्द उभारलेल्या लढ्याचा आढावा घेणे.
2.वैदिक पुनरूज्जीवनाची शिकवण देणाऱ्या आर्य समाजाने भारतीय राष्ट्रवादाच्या विकासात बजावलेल्या कामगिरीवर प्रकाश टाकणे.
3.हैद्राबाद मुक्तिसंग्रामात उदगीर तालुक्यातील आर्य समाजाने केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

### *हैद्राबाद संस्थानाची पार्श्वभूमी :*

हैद्राबाद संस्थानावर निजामाची म्हणजेच असफजाही घराण्याची सत्ता इ.स.1724 पासून इ.स. 1948 पर्यंत अस्तित्वात होती. या संस्थानाचे मुळ पुरूष मीर कमरूद्दीनखान निजाम–उल–मुल्क असफजहा हे होते. हा औरंगजेब बादशहाच्या फौजेत तुर्की अधिकारी होता. औरंगजेबाच्या मृत्युनंतर झालेल्या सत्ता संघर्षात फर्रूखसियरला राज्यप्राप्तीसाठी याने महत्वपूर्ण मदत केली होती म्हणून फर्रूखसियरने त्यास निजाम उल मुल्क असफजहा असा किताब दिला. दरम्यान दिल्लीत राजकीय गोंधळ सुरू होवून मोगल दरबारात अस्थिरता निर्माण झाली होती. दिल्लीच्या गादीवर फर्रूखसियर हा बादशहा असला तरी सय्यद हुसेन या बंधूचे वर्चस्व होते. 20 फेब्रुवारी 1722 रोजी बादशहाने निजामाला दिल्लीच्या वजीराची सुत्रे बहाल केली पण बादशहाशी त्याचे जुळले नाही. म्हणून इ.स. 1724 मध्ये दक्षिणेत निजामाने हैद्रबाद या स्वतंत्र राज्याची स्थापना केली व पुढे जवळ जवळ 225 वर्ष ही जुलमी राजवट टिकून होती. इ.स.1724 ते इ. स. 1948 या कालावधीत दहा निजामांनी राज्य केले. निजाम व असफजाही घराण्यांच्या बुरसटलेल्या संरजामशाही व हूकुमशाही प्रवृत्तीला साजेल असे हैद्राबाद संस्थानचे व तेथील राज्यव्यवस्थेचे अंतरंग होते. भारतातील लहान मोठ्या 563 संस्थानापैकी पहिल्या तीन संस्थानात हैद्राबादची गणना होत असे.[1] हैद्राबाद संस्थानाचे एकूण क्षेत्रफळ 82,313 चौरस मैलाचे होते. तर लोकसंख्या 1941 च्या जनगणनेनुसार 1 कोटी 63 लाख 38 हजार 534 होती. या संस्थानात तेलगू, मराठी, कन्नड आणि उर्दु भाषिक जनतेचे वास्तव्य होते. या भाषिकांची लोकसंख्या पुढील प्रमाणे होती. तेलगू 75,29,229 (48%), मराठी 39,47,089 (26.5%), कन्नड 17,24,180 (10.5%), उर्दु 21,87,005 (15.15%) या खेरीज राज्याची विभागणी ज्या तीन विभागात झाली होती. त्याचे क्षेत्रफळ व लोकसंख्या पुढील प्रमाणे तेलंगना क्षेत्रफळ 41,502 चौ. मै. व लोकसंख्या 86,35,131, मराठवाडा क्षेत्रफळ 27,591 चौ.मै. व लोकसंख्या 52,19,528 आणि कर्नाटकचे क्षेत्रफळ 13,605 चौ.मै. व लोकसंख्या 23,39,654 होती.[2] या संस्थानात एकूण खेडी 22,360 तर शहरे 138 होती. संस्थानावर मुस्लीमांचे वर्चस्व होते. तेथील धर्मनिहाय लोकसंख्या पुढील प्रमाणे हिंदू 1,33,9,649 मुस्लीम 2097475 तर खिस्ती 220463 आणि इतर 710946 अशी होती. हिंदू बहुसंख्य होते. मात्र राजवट मुस्लीम असल्याने त्यांनी जनतेवर लादलेली अन्यायकारक बंधने, अन्यायकारक संघटना परिणामी हिंदू जनतेवर अन्याय व अत्याचार होवून त्यांची कुंचबना होत असे.[3] याला प्रतिकार करण्यासाठी ज्या विविध संघटना होत्या त्यात 'आर्य समाज' व विशेषतः उदगीर तालुक्यातील आर्य समाजाचे कार्य उल्लेखनिय आहे. याची चर्चा आपण प्रस्तुत शोध निबंधात करणार आहोत.

### *आर्य समाजाची स्थापना :*

स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म सौराष्ट्रातील संस्थानात टंकारा या गावी 20 सप्टेंबर 1824 या दिवशी झाला. दयानंदाचे मूळ नाव मुलशंकर उर्फ दयाराम होते.[4] दयानंदानी अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी, परंपरा, धर्माचे सद्यस्थितीतील अभद्र रूप याचे खंडण करण्यासाठी पथाका उभारून आपल्या विचारांच्या प्रसारासाठी एखादी संस्था आवश्यक आहे असे दयानंदांना वाटू लागले आणि 10 एप्रिल 1975 या दिवशी गिरगाव येथे डॉ. माणिकचंदाच्या (डॉ. माणिकजी अर्देसर जी या पारशी गृहस्थाच्या उद्यानात) सायंकाळी 5.30 वा. आर्य समाजाची स्थापना करण्यात आली.[5] पण बडोद्याचे श्री पं.चंद्रमणीने साप्ताहिक 'आर्य मित्र' मध्ये नमूद केले होते की, मुंबईच्या पण पुर्वी राजकोट येथे आर्यसमाजाची स्थापना झाल्याचे प्रमाण मिळाले आहे, पण राजकोट येथील आर्य व्यक्तीशी विचारपूस व चर्चा केल्यानंतर असे दिसून आले की या ठिकाणी विधीपुर्वक आर्यसमाजाची स्थापना झाली नव्हती.[6] यानंतरही दयानंदाच्या उपस्थितीत अहमदाबाद येथे 27 जानेवारी 1875 या दिवशी आर्य समाजाचीस्थापना झाली. त्यानंतर दयानंद मुंबई येथे आले आणि विधीपुर्वक आर्य समाजाची स्थापना केली.

हैद्राबाद संस्थानात आर्यसमाजाचा इतिहास वैदिक धर्माच्या पुनर्उध्दाराबरोबर स्वराज्य, स्वतंत्रता प्राप्त करणाऱ्या आंदोलकाचा इतिहास आहे. या पार्श्वभूमीवर अजमेरचे श्री भागवत स्वरूप व श्री गोकुळ प्रसाद यांच्या प्रयत्नाने इ.स.1891 मध्ये सर्वप्रथम हैद्राबाद संस्थानात आर्यसमाजाची स्थापना बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर या गावी झाली.

हैद्राबाद संस्थानामध्ये आर्य समाजाची दुसरी शाखा इ.स. 1892 मध्ये हैद्राबादच्या सुलतान बाजार या ठिकाणी झाली.[7] पुढे चालून ऑक्टोबर 1926 मध्ये उदगीर येथे भाई शामलालजीने 'आर्य समाजाची' स्थापना केली. या स्थापनेस स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या लढ्यात उदगीर तालुक्यातील आर्य समाजाचे बहुमूल्य व अविस्मरणीय असे प्रबोधनात्मक कार्य आहे. किंबहुना या संस्थानातील महत्वाच्या आर्य समाजाच्या केंद्रापैकी उदगीर हे एक महत्वाचे केंद्र होते व या मुक्तिसंग्रामात यांनी मोलाची भूमिका पार पाडली. उदगीर व आसपासच्या खेड्यातल अनेक शूरविरांनी या समाजा मार्फत बंड केले. निजामाच्या जुलूम, अन्याय व अत्याचाराला विरोध केला.[8] मात्र आर्य समाजाचे कार्य जसजसे वाढू लागले तसे निजाम शासन विरोधी बनत गेले. अर्थातच निजाम शासनाचे अत्याचार जसे वाढत गेले तसे या समाजाला एक क्रांतीकारी आंदोलनाचे स्वरूप प्राप्त होत गेले आणि निरंतर संघर्षामुळे या आंदोलनाची शक्ती वृध्दिंगतच होत गेली. हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. हजारो ध्येयवादी तरूण कार्यकर्ते एकत्र येवून या लढ्यात सहभागी झाले ते गावोगावी फिरून जागृत करू लागले. पारंतत्र्य, अन्याय व अत्याचाराविरूध्द सामान्य जनता पेटून उठली. निजामाची राजवट संपविणे आणि स्वतंत्र भारतीय संघराज्यात हैद्राबाद संस्थानाचे विलीनीकरण करणे, नागरिकांना अन्याय, अत्याचाराच्या जाचातून मुक्त करणे या ध्येयाने हैद्राबादचा मुक्ति लढा सुरू झाला.[9] उदगीर तालुका आर्य समाजही या लढ्याच्या सहभागातून वंचित नव्हता; याची चर्चा आपण पुढील प्रमाणे करणार आहोत.

### *1) हुतात्मा भाई शामलालजी*

निजामाच्या जुलमी राजवटीशी झुंज देवून शहीद होणाऱ्या विरांमध्ये हुतात्मा भाई शामलालजी यांचे नाव आज आजरामर झाले आहे. यांनीच उदगीर येथे सर्वप्रथम ऑक्टोबर 1926 ला आर्य समाजाची स्थापना करून कार्यास सुरूवात केली. इ.स. 1938 मध्ये उदगीरला दसरा उत्सवाच्या वेळी हिंदू व मुस्लीम यांच्यातील दंगल ही त्या काळातील अतिशय महत्वाची घटना म्हणता येईल.[10] दसऱ्याच्या दिवशी जात, धर्मभेद, विसरून सिमोल्लंघन करण्याची उदगीर मधील प्रथा उल्लेखनीय अशीच आहे. किंबहुना आर्यसमाजाच्या चळवळीमुळे सर्व समाज संघटीत होवू लागला. या मुळे मुस्लीम अस्वस्थ होते व यातूनच हिंदूंना व त्यांच्या भगव्या झेंड्याला विरोध करण्यास सुरूवात झाली. एक बाब या ठिकाणी लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे पुर्वी मुस्लीमांनी भगव्या झेंड्यास विरोध केला नव्हता. पण आता या झेंड्यास शत्रु समजत होते प्रत्येक वर्षी दसऱ्याला मिरवणूक निघत असे पण इ.स. 1938 च्या दसरा उत्सवात शस्त्र व भगव्या झेंड्यास परवानगी दिली नाही. परंतु चौबाऱ्यानंतर काही तरूणांनी अचानक मिरवणुकीमध्ये भगवे झेंडे आणले आणि मुस्लीम लोक शस्त्र घेवून झेंडे काढून घेण्यासाठी मिरवणूकीकडे निघाले असता हिंदू व मुस्लीम यांच्यात बाचाबाची झाली. त्यात माणिकरावाचा मृत्यु झाला, कप्पीकेरी जखमी झाले. पण यात भाई शामलालजी बचावले आणि त्यांचे जीवन परत राष्ट्कार्यासाठी सज्ज झाले.[11] काही कालावधीनंतर भाईंना अटक करून बिदर येथील कारागृहात ठेवून त्यांच्यावर विषप्रयोग केला व 16 डिसेंबर 1938 च्या काळरात्री भाईंनी शेवटचा श्वास घेतला. भाई हे आर्यसमाजाचे सच्चे अनुयायी, खंदे कार्यकर्ते व धाडसी प्रचारक म्हणून इतिहासात अमर झाले. भाई हे निधड्या छातीचे, निर्भय व बेडर वक्ते असून काळाच्या पुढे असलेले क्रांतीकारक होते. ऐन तारूण्यात आपले जीवनपुष्प मातृभूमीच्या चरणी समर्पीत करणारे भाई श्यामलालजी हैद्रबादच्या मुक्तिसंग्रामातील एक रोमांचकारी योध्दा म्हणून अमर ठरले आहेत. त्यांचे कर्तृत्व स्वातंत्र्याच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहण्यासारखे आहे.

### *2) कर्मवीर भाई बन्सीलाल*

भाई बन्सीलाल हे हुतात्मा भाई श्यामलालजींचे श्रेष्ठ बंधू आहेत. हैद्राबाद संस्थानातील केलेली जागृती आणि आर्य समाजासंदर्भात त्यांचे योगदान हे बहुमूल्य व निर्णायक आहे. संस्थानातील अन्यायाच्या विरोधात त्यांनी 'हैद्राबाद दिवस' साजरा करण्याचे आदेश दिले. निजामाने आर्य रक्षा समितीस कायदे बाह्य ठरवून सत्याग्रहींना अटक केली. तसेच त्यांना शिक्षा सुनावण्यात आल्या. त्यामुळे राज्यातील सर्व तुरूंग तुडूंब भरले तेव्हा निजामाला तडजोडीशिवाय पर्याय राहिला नाही. साहजिकच निजामाने आर्यसमाजाच्या सर्व मागण्या मान्य केल्या. आर्यसमाजाने केलेल्या सत्याग्रहाचे हे यश अभूतपूर्व होते. याचे श्रेय बन्सीलालजी व त्यांच्या संघटन कौशल्यालाच द्यावे लागेल.[12]

या यशस्वी व निर्णायक सत्याग्रहानंतर बन्सीलालजींनी उदगीर येथे हैद्राबाद संस्थानाचे पहिले आर्य संमेलन घेण्याचा निर्णय घेतला व हे संमेलन इ.स.1942 मध्ये उदगीर येथे मोठ्या उत्साहाने पार पाडले.

### *3) हुतात्मा बापूराव डावळे मास्तर*

आर्य समाजाचे एक धडाडीचे व निर्भीड कार्यकर्ते म्हणून बापूराव मास्तर यांचे नावलौकिक आहे. मल्लखांब, कुस्ती, काठी तलवार चालवणे, बंदूकीचे निशाण धरणे हे त्यांचे आवडते खेळ होते. इ.स. 1938 च्या आर्य समाजी सत्याग्रहात मास्तरांनी भाग घेतला व नाव बदलून बळवंतराव असे सांगितले होते. म्हणून 6 महिने कारावास भोगून सर्व

सत्याग्रही बरोबर त्यांची सुटका झाली. जेव्हा जेव्हा सत्याग्रह होत असत त्यामध्ये ते भाग घेत असत. 15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले पण निजामाने मात्र स्वतंत्र अस्तीत्व जाहिर केले. त्यामुळे जनतेने 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम' उभारला व काही ठिकाणी कॅम्प उभारून सशस्त्र लढा दिला. यातच आप्पाराव पाटील कौळखेडकर यांची टोळी होती व त्यात बापूराव मास्तर होते. दरम्यान निजामाचे सैन्य व यांच्यात बंदूकीच्या गोळीची चकमक घडत होती. बापू खिळपटाच्या आडोशाला मोर्चा बांधून बंदूक चालवत होते. निजामाचे लष्कर रायफलसह सज्ज होते. तेवढ्यात शत्रूची एक गोळी आली व बापूच्या डोक्यातून निघून गेली. बापू कोसळले, धारातिर्थी पडले व हुतात्मा झाले म्हणून उदगीर येथील हुतात्मा स्मारकावर बापूंचे नाव दुसऱ्या क्रमांकावर नोंदविलेले आहे.[13]

### *4) तुळशीराम कांबळे (माजी खासदार)*

उदगीर तालुक्यातील आर्य समाजाच्या व्यापक विचारसणीमुळे तसेच श्यामलालजी व बन्सीलालजी यांच्या प्रेरणेने अनेकजण घडत होते. त्यातील एक महत्वपुर्ण व्यक्ती म्हणजे माजी खासदार तुळशीराम कांबळे होय. सोलापूर या ठिकाणी 'अखिल भारतीय आर्यन कॉन्फरन्स' घेण्याचे ठरले. याकरिता उदगीर विभागातून स्वयंसेवक पाठविण्याचे ठरले. 18 स्वयंसेवकाचा जथ्था घेवून सोलापूरला जाण्याची जबाबदारी तुळशीरामजीवर आली व त्यांनी ती योग्यरित्या पार पाडली या संमेलनात हैद्राबाद संस्थानात व्यापक सत्याग्रह करण्याचे निश्चित केले व संमेलनानंतर सत्याग्रहाची सुरूवात झाली. तुळशीरामजी यांनी एक जथ्थेदार म्हणून हैद्राबाद येथे आणखी तीन जणांसह सत्याग्रह केला. या बदल्यात तुळशीरामजींना एक वर्षाची शिक्षा झाली. कालांतराने आर्य समाजाच्या मागण्या मान्य झाल्या, ऑगस्ट 1939 ला सर्व सत्याग्रहींना सोडण्यात आले व आर्य सत्याग्रह संपला. यानंतरही तुळशीरामजींनी आर्य समजाचे विधायक कार्य ते चालूच ठेवले.[14]

### *5) माधवराव घोनसीकर*

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील झुंजार व्यक्तीमत्व म्हणून यांचे ओळख आहे. आर्य समाज चळवळीच्या माध्यमातून यांनी जनजागृतीचे कार्य केले. अनेकांच्या मनात स्वातंत्र्याची, हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या विचारांची ज्योती प्रज्वलित केली. त्यांच्या प्रभावी व निर्भड वक्तृत्वाने त्यांनी जनतेला निजामी राजवटीतील अन्यायाविरूध्द लढा देण्याची भावना चेतवली. त्यामुळे अनेक लढवय्य तरूण या संग्रामात त्यांच्या प्रेरणेने सहभागी होवून निजामाच्या अन्यायी, जुलमी, अत्याचाराला ते वाचा फोडत असत. कॅम्पवरील सशस्त्र लढ्यांना पाठिंबा देणे, रझाकारांचा हल्ला झाल्यास त्याला प्रतिकार करण्याची तयारी ठेवणे, प्रतीहल्ल्याची योजना करणे, कार्यकर्त्यांना संघटित करणे, प्रोत्साहन देणे, चळवळी उभ्या करणे आदि कार्यातून ते या परिसरातील जनतेला जागृत करीत असत.[15]

### *6) विद्यासागर गुरूजी*

विद्यासागर गुरूजींची आर्य समाजाच्या कार्यक्रमावर, धोरणावर, विचारावर श्रध्दा होती म्हणून ते आर्य समाजाच्या कार्यात सक्रीय भाग घेवू लागले. विद्यार्थ्यात आर्य समाजी विचार आणि देशभक्ती रूजविण्याचे कार्य त्यांनी सतत पार पाडले. 'सत्याग्रहींना चिथावणी दिली' हा आरोप ठेवून यांना पोलीसांनी अटक केली व बिदर येथेत्यांना एक महिना दहा दिवस कारावास भोगावा लागला. अशा प्रकारे गुरुजींनी मुक्ति लढ्यात सहभाग नोंदविला.[16]

### *7) निवृत्ती राम कोटलवार*

आर्य समाजी मित्राच्या सहवासातून कार्याची सुरूवात करून अन्यायी निजामाच्या जोखंडातून मुक्तिसाठी प्रयत्न करण्यास सुरूवात केली. निजामी राज्यात झेंडा वंदनास व झेंडा गित म्हणण्यास बंदी असताना ही ती बंदी न जुमानता झेंडावंदन सत्याग्रहात भाग घेवून झेंडा वंदन केले. निवृत्ती कोटलवार बरोबर सर्व सत्याग्रहींना अटक करण्यात आली व सगळ्यांना बिदर, गुलबर्गा व हैद्राबाद येथे14 महिने कारावास भोगावा लागला.

### *8) दासराव मुस्कावाड*

दासराव मुस्कावाड हे सामाजिक क्षेत्रातील आर्य समाजाचे धडाडीचे कार्यकर्ते म्हणून नाव लौकिक होते. इ.स. 1938 या वर्षी आर्य समाज सत्याग्रहात सहभाग नोंदविल्यामुळे 5 महिने तुरूंगवास भोगावा लागला. बौध्दिक व मानसिक दृष्ट्या रझाकाराविरूध्द लढा देण्यासाठी जनतेला सक्षम करीत होते.[17]

### *9) विठ्ठल रामजी मुस्कावाड*

निजामी राजवटीतील अन्याय, जुलूम याच्या विरोधात आवाज उठविण्याचे कार्य यांनी केले. इ.स.1938 मधील सत्याग्रहात यांना सहा महिन्याची शिक्षा झाली. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात तरूणांना प्रेरित करून 2 सप्टेंबर 1947 ला अग्रभागी राहून प्रथम सत्याग्रह करून झेंडावंदन केल्याबद्दल यांना 18 महिने शिक्षा झाली होती.[18]

### *10) शंकर विठ्ठल बिराजदार*

सप्टेंबर 1947 मध्ये उदगीर तालुक्यात सत्याग्रहाचे वारे वाहू लागले. बंदी असतानाही सामुहिक झेंडावंदन होवू लागले. यामध्ये शंकर विठ्ठल बिराजदार यांनी सहभाग नोंदवून 'भारत माता की जय', 'जिम्मेदारांना हुकूमत लेके रहेगे' या घोषणा दिल्यामुळे अटक करताना पोलीस अधिकारी म्हणाला, 'तुम अभी बच्चे हो, वापिस जाव हम तुम्हे छोड देंगे' यावर त्यांनी निर्भिडपणे 'मै वापीस नही जाऊंगा' बजावले व हैद्राबाद मुक्तीसंग्रामात अखेरपर्यंत ते झुंज देत राहिले.[19]

### *11) बाबाराव येलबा मुडपे*

इ.स. 1937–38 यावर्षी हंगामी प्रांतिक सरकार स्थापन झाले तेव्हा ते वरिष्ठ पुढाऱ्यांना न विचारताच एका सत्याग्रही जथ्थात भाग घेतला आणि यांना आष्टी तालुक्यात अटक झाली. आष्टी न्यायालयाने त्यांना शिक्षेची सुनावणी करून बीड कारागृहात पाठविण्यात आले. तेथे त्यांनी एक महिन्यापेक्षा जास्त त्यांनी शिक्षा भोगली. परंतु कालांतराने निजामाच्या आदेशानुसार वृध्द, अल्पवयीन व अशक्त यांना सोडण्यात आले. त्यामध्ये बाबारावजी मुडपे घरी होते. घरी आल्यानंतर परत आर्य समाजाचे कार्य करीत राहिले आणि 2 सप्टेंबर 1947 ला तिरंगा झेंडा फडकावल्या बद्दल मुडपे व त्यांच्या सत्याग्रहींना अटक झाली. उदगीर न्यायालयाने दीड वर्षाची शिक्षा व दिडशे रूपये दंड करून बिदर कारागृहात रवानगी करण्यात आली त्यानंतर अनुक्रमे गुलबर्गा, हैद्राबाद, चंचलगुडा व पुढे औरंगाबाद येथे कारावास भोगावा लागला व अखेर 17 सप्टेंबर 1948 या दिवशी निजामी राजवटीचा अंत झाला आणि यांचा कारावास संपुष्टात आला.[20]

### *12) तुकाराम संभाजी थोटे*

डदगीर तालुक्यातील जे कट्टर आर्य समाजी म्हणून ओळखले जातात. त्यातील महत्वपूर्ण व्यक्तीमत्व म्हणजे तुकाराम संभाजी थोटे होय. तुकाराम थोटे व त्यांच्या शेतीवर काम करणारा भिमराव रामा काळे या दोघांनी 22 जानेवारी 1939 नळगीरला सत्याग्रह केला. आर्य समाज मंदीर येथून हातात ओउम चा झेंडा घेवून 'जो बोले सो अभय वैदिक धर्म की जय', 'भारत माता की जय', 'हम दयानंद के सैनिक है दुनिया मे धुम मचा देंगे अगर आये परबत रास्ते मे ठोकरसे उसे हटा देंगे' हे गित गात नळगीर येथील सरकारी चावडी समोर आले. तेथेच सार्वदेषिक आर्य प्रतिनिधीकडून आलेले 'हैद्राबाद डे' पत्रक वाचून दाखविण्यात आले. त्यानंतर 24 जानेवारी 1939 ला त्यांना अटक करण्यात आली. उदगीर न्यायालयाने कलम 26 अलिफ व कलम 28 दस्तुरूल अंमल तहफुज या कलमाखाली तुकाराम थोटेंनी दीड वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व भिमराव यांना 1 वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली. पुढे निजाम सरकारने आर्य प्रतिनिधी सभेच्या मागण्या मान्य केल्या व सर्व कैद्यांची कारागृहातून मुक्तता केली. मात्र भिमरावला नारु झाल्यामुळे त्यास बिदर कारागृहात ठेवण्यात आले व कालांतराने पुढे त्यांचीही सुटका करण्यात आली.[21]

अशा प्रकारे हैद्राबादच्या मुक्तिसाठी पेटलेल्या अग्निपासून उदगीर तालुका ही मुक्त राहिलेला नव्हता. या तालुक्यातील लहानापासून मोठ्यापर्यंत सगळ्यामध्ये स्वातंत्र्य, देशभक्तीचे वारे वाहत होते आणि आर्यसमाजाने या सगळ्यांना योग्य वळण देवून हैद्राबादच्या मुक्तिसंग्रामात सहभाग नोंदवला होता. अखेर 17 सप्टेंबर 1948 रोजी प्राणपणाने लढणाऱ्या जनतेच्या कार्याचे व अनेक हुतात्म्यांच्या कार्याचे सोने होवून संस्थानातील निजामांची जुलमी राजवट संपुष्टात येवून हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आले. यात उदगीर तालुक्यातील आर्य समाजाचे कार्य हे बहुमूल्य व अविस्मरणीय आहे.

### *निष्कर्ष*

1)आर्य समाजाने धार्मिक, सामाजिक सुधारणेबरोबरच भारताची स्वतंत्रता व अखंडता मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठीचा उभारलेला हा मुक्तिसंग्राम होय.
2)उदगीर तालुक्यातील जनतेमध्ये स्वातंत्र्य संग्रामाची जागृती करून आंदोलनाची पायाभरणी करण्याचे कार्य आर्य समाजाने केले.
3)उदगीर येथील आर्य समाजाने हैद्राबाद मुक्तिसंग्रामात निर्णायक भूमिका पार पाडली.
4) हैद्राबाद संस्थानातील आर्य समाजाच्या केंद्रापैकी उदगीर हे एक महत्वाचे केंद्र होते.

5)अन्यायी, धर्मपिसाट, एक तंत्री निजामी राजवट नेस्तनाबूत होवून संसदीय लोकशाही आणि लोकप्रतिनिधीक सरकार अस्तित्वात आले.

## *संदर्भसूची*


1)गव्हाणे किशोरकुमार, शिंदे एस. पी., कुलकर्णी ज.र., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरूणा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती 2 ऑक्टोंबर 2014 पृ.क्र.402

2)भालेराव अनंत, हैद्राबादचा स्वतंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन आणि भारत मुद्रक प्रकाशन लि. औरंगाबाद, सप्टेंबर 1987, पृ.क्र. 09

3)भांडवलकर एस.एस. हनवते यु.एस., मराठवाड्याचा इतिहास, अभिजित पब्लिकेशन, लातूर प्रथम आवृत्ती, जून 1999, पृष्ठ क्र. 96, 97.

4)जोशी श्रीपाद, महर्षी दयानंद सरस्वती, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा, नांदेड, प्रथम आवृत्ती, जून 1992 पृष्ठ क्र. 04

5)विद्यावायस्पती इंद्र, आर्य समाज का इतिहास (प्रथम भाग), सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, दिल्ली, प्रथम आवृत्ती – जून 2011 पृष्ठ क्र. 72

6)कित्ता, पृष्ठ क्र. 312

7)Maharashtra State Gazetier, Osmanabad District first Edition- 1972- P.N.109

8)निलकंटे षण्मुखप्पा, प्रभूरावजी कंबलीवाले (जीवन चरित्र), वीरशैव विद्यावर्धक संघ, यादगीर (कर्नाटक) प्रथम संस्करण – 1999, पृ.क्र. 13, 14

9)रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती – जून 2011 पृ. क्र. 154, 155

10)पंडित नरेंद्र, हैद्राबाद मे आर्य समाज का संघर्ष, सार्वदेशिक प्रकाशन लिमिटेड, दिल्ली, पृष्ठ क्र. 13.

11)तंगावार मल्लिकार्जून, धर्मवीर संग्रामप्पा जीवन व कार्य, वीरशैव समाज, उदगीर, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट 2005, पृ.क्र. 19 – 20.

12)उजळंबकर कृष्ण मुकूंद, मराठवाड्याचे मानकरी खंड 5 वा, कालिंदी प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती – 1998 पृ.क्र. 36, 37

13)कुलकर्णी खंडेराव (संपा.) हैद्राबाद मुक्तिसंग्राम : एक क्रांतीकारी पर्व (मुलाखत संग्रह) स्वातंत्र्य समिती, गुडसूर, पृ.क्र. 59, 61

14)उपरोक्त, पृष्ठ क्र. 11 – 14

15)कित्ता, पृष्ठ क्र. 16,17

16)कित्ता, पृष्ठ क्र. 20 – 22

17)कित्ता, पृष्ठ क्र. 52 – 53

18)कित्ता, पृष्ठ क्र. 18 – 19

19)कित्ता, पृष्ठ क्र. 43

20)कित्ता, पृष्ठ क्र. 30 – 32

21)कित्ता, पृष्ठ क्र. 56, 58